जिव्हाळ्याची बँक

डेक्कन मर्चंट्स को ऑप. बँक लि. साठी हे वर्ष महत्त्वाचे होते. बँकेने या वर्षात अनेक महत्त्वाच्या गोष्टी साध्य केल्या आणि सर्वच स्तरावर प्रगती केली. संपूर्ण जगाला यावर्षात मंदीने ग्रासले होते. भारतीय अर्थव्यवस्थेला मंदीची

तितकीशी झळ बसली नसली तरी मंदीचे परिणाम मात्र निश्चितच जाणवले. उद्योगधंदे, व्यवसायामध्ये यावर्षी काही प्रमाणात शिथिलता दिसून आली. शेअर बाजारातील सातत्याने होणाऱ्या चढ-उतारामुळे आपली बँकच बरी या विचाराने बरेचसे लोक पुन्हा बँकेकडे वळू लागले. वाढत्या महागाईमुळे समाजात नैराश्य आल्याचे बँकिंग व्यवसाय करताना सातत्याने जाणवत आहे आणि त्यामुळेच आर्थिक मार्गदर्शक म्हणून बँकांची भूमिका महत्त्वाची ठरत आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेचे वेळोवेळी लागू करण्यात येणारे नवीन नियम आणि ३३.३३% इतका सरकारने सहकारी बँकांवर लादलेला अवाजवी आयकर यामुळे कामकाज करताना कसरत करावी लागत आहे. आर्थिक वर्ष २०१०-२०११ पासून बचत खात्यावर दैनंदिन पद्धतीने व्याज देण्याचे रिझर्व्ह बँकेने निर्देश दिले आहेत. त्यामुळे साहजिकच बँकेच्या देय व्याजावरील खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे. सर्वच बँकांनी ठेवींवरील व्याजदर कमी केले होते. डेक्कन मर्चंट्स को ऑप. बँकेलाही नफा क्षमतेचा विचार करता ठेवींवरील व्याजदर कमी करावे लागले. परंतू आपल्या सभासदांच्या व ठेवीदारांच्या दृढ विश्वासामुळे व्याजदर कमी करूनही आपल्या बँकेच्या ठेवीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली.

शाखा विस्ताराच्या स्पर्धेत सर्व बँका उतरल्या असल्याने ग्राहकांसमोर बँकिंग संदर्भात अनेक पर्याय उपलब्ध होत आहेत. आजच्या नवीन पिढीच्या बँकिंगबाबतच्या कल्पना आणि अपेक्षा बदललेल्या असून आधुनिक बँकिंग सुविधा अत्यावश्यक झाल्या आहेत. असे जरी असले तरीसुद्धा समाजात अजूनही सर्वसामान्य माणसांचा असा एक मोठा वर्ग आहे की ज्यांना जिव्हाळ्याची आणि आपुलकीची सेवा देणाऱ्या स्वतःच्या हक्काच्या वाटणाऱ्या आपल्यासारख्या सहकारी बँकेची गरज आहे आणि त्यामुळेच आपले अस्तित्व अबाधित आहे. आमच्या सभासदांना आणि ग्राहकांना बँकिंगच्या सर्व आधुनिक सुविधांचा लाभ व्हावा याकरिता आम्ही कायम प्रयत्नशील आहोत.

याच दृष्टीकोनातून डेक्कन मर्चंट्स को ऑप. बँकेने कोअर बँकिंगचा महत्त्वपूर्ण प्रकल्प हाती घेतला होता. अहवाल सालात बँकेच्या कोअर बँकिंग प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असून दिनांक २४.७.२०१० रोजी एनी व्हेअर बँकिंग व एस्एमएस बँकिंगचा शुभारंभ सोहळा पार पडला. यानंतर लवकरच आपणास टेलिबँकिंग व इंटरनेट बँकिंग या सुविधा प्राप्त होतील की जेणेकरून आपण कुठूनही आपल्या खात्याचे व्यवहार करू शकाल. ए.टी.एम. व कोअर बँकिंग सुविधांबरोबरच आपण खातेदारांना एचडीएफसी बँकेमार्फत आरटीजीएस् व एनईएफटी या सुविधा देत असून त्यामुळे अल्प शुल्कामध्ये केवळ लेखी सूचना देऊन देशभरात अल्पावधीत कुठेही पैसे पाठविण्याची सुविधा आपल्या सर्व खातेदारांना प्राप्त झाली आहे. अनेक खातेदार या सुविधांचा लाभ घेत आहेत.

बँकेची सेवा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावी आणि बँकिंग क्षेत्रातील अटीतटीच्या स्पर्धेत आपले स्थान टिकून रहावे याकरिता आपण शाखा विस्ताराला विशेष प्राधान्य दिले आहे. याचाच एक भाग म्हणजे पूणे येथील हडपसर येथे लवकरच शाखा सुरू करण्यात येत आहे.

काशिनाथ दि. मोरे
अध्यक्ष, दि डेक्कन मर्चन्टस
को-ऑप. बँक लि.

"गेल्या वर्षी जागतिक मंदीतही डेक्कन मर्चंट्स को ऑप. बँक लि.ने चांगले यश मिळविले. ग्राहकांप्रती जिव्हाळा आणि आपुलकीची सेवा या बळावर आजही या बँकेने ग्राहकांना आपल्याकडे वळविले असून बँकेची यशस्वी वाटचाल सुरूच आहे"